# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/05/2023 (शुक्रवार) दुपार


### रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत १८ किमी अंतरावर मौजा पुसदा पुर्नवसन दिनांक ११/०५/२०२३ चे १९/०० वा. ते १९/४० वा. दरम्यान पोलीस स्टेशन देवलापार येथील स्टाफ पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, मौजा पुसदा पुर्नवसन येथे काही इसम अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे अशा मिळालेल्या माहिती वरून नमुद घटनास्थळी जावुन **आरोपी नामे–शुभम देवाजी महाजन, वय २९ वर्ष, रा. कवडक दुधाळा** हा त्याच्या ताब्यातील एक लाल रंगाचा महींद्रा कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम. एच.– ४०/एल– ६५९२ व लाल रंगाची विना क्रमांकाची ट्राली मध्ये रेती भरून शासनाचा कर चूकवून विना परवाना गौण खनिज (रेती) ची नाल्यातुन चोरी करून व चोरटी वाहतुक करतांनी पंचासमक्ष मिळुन आल्याने त्याचे ताब्यातुन एक लाल रंगाचे महींद्रा कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम. एच.–४०/एल–६५९२ व लाल रंगाची विना क्रमांकाची ट्राली किंमती अंदाजे ४५००००/– रू. व १ ब्रास रेती किंमती ५०००/– रू वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह असा एकुण ४५५०००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोशि सचिन डायलकर ब. नं. १५ पोस्टे देवलापार यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादवी सहकलम ३/१८१, १४६/१९६ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनी मेश्राम मो. क्र. ९९२३७९८६८८ हे करीत आहे.

### लोखंडी टिन चोरी

१) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा बनसेंगी पारशिवनी येथे दिनांक १०/०५/२०२३ चे दुपारी १२/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– लक्ष्मण दौलत येरखेडे, वय ६१ वर्ष, रा. पारशिवनी हे आपल्या शेतामध्ये गेले असता यातील आरोपी क्र. १) प्रशांत भागवत सोबत २ अनोळखी इसमासह शेतातील टिनाचे शेडचे ०३ जुन्या वापरत्या टिना घेवून जातांना दिसले त्यांना थांबण्यास सांगितले असता ते टिनासह पळून गेले यातील आरोपी क्र. १, ०२, ०३ यांनी शेतातील लोखंडी टिनाचे शेडचे ३ लोखंडी टिना किंमती अंदाजे ३०००/– रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा गजानन उके बोंद्रे मो. क्र. ९८८१२४१०८९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर